# आंतर महाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये पदकांची लुट

**सोनई:** दि. ७ ते ९ आक्टोबर २०१८ या दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व अहमदनगर जिल्हा क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, मालपाणी महाविद्यालय, संगमनेर येथे पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई च्या खेळाडूंनी एकुण 30 पदके जिंकले. या मध्ये मुलीनी सुद्धा स्पर्धेमध्ये हिरीरीने सहभाग घेऊन पदकांची लुट केली. 1) कु. आरती दत्तात्रय दहिफळे हिने ११० मीटर अडथळा शर्यत मध्ये प्रथम क्रमांक व भालाफेकमध्ये दुसरा क्रमांक मिळविला 2) कु. रेणुका दत्तात्रय भुसाळ हिने थाळीफेक प्रथम व गोळाफेक प्रथम 3) कु. दिव्या गोरख जगदाळे हि उंच उडी प्रथम व लांब उडी दुसरा क्रमांक मिळविला. ४x१०० रिले स्पर्धेमध्ये तृतिय क्रमांक कु. महिमा सावकाश भोसले, कु. कोमल रावसाहेब तांबे , कु. आरती दत्तात्रय दहिफळे व कु. दिव्या गोरख जगदाळे यांनी मिळविला. मुलांमध्ये 1) ऋषिकेश सुनिल कुऱ्हे याने भालाफेक प्रथम क्रमांक व लांब उडी दुसरा क्रमांक मिळविला. 2) मयुर दिगंबर सोनवणे याने उंच उडी व लांब उडीमध्ये प्रथम क्रमांक, 3) अभिजित सुभाष राख याने हातोडाफेक प्रथम व थाळीफेक दुसरा क्रमांक मिळविला. 4) विशाल नामदेव वने याने थाळीफेक प्रथम व गोळाफेक दुसरा क्रमांक मिळविला. 5) उदय पाटीलबा दरंदले याने तिहेरी उडीमध्ये दुसरा क्रमांक मिळविला.6) निकेतन दिगंबर धाकतोडे याने ११० मीटर अडथळा शर्यत मध्ये दुसरा क्रमांक मिळविला. ४x१०० रिले स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक वैभव महादेव दराडे, उदय पाटीलबा दरंदले, मयुर दिगंबर सोनवणे व ऋषिकेश सुनिल कुऱ्हे यांनी मिळविला. ४x४०० रिले स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक सोन्याबापू नानासाहेब चोपडे, विजय बाळासाहेब सोनवणे, निकेतन दिगंबर धाकतोडे व अमोल पोपट येवले यांनी मिळविला. या सर्व विजेत्या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रविंद्र खंदारे यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व विजेत्या खेळाडूंचे व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रविंद्र खंदारे यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. प्रशांत पाटील गडाख, सचिव उत्तमराव लोंढे व सहसचिव डॉ. विनायकराव देशमुख आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर लावरे, उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.


617
SOANI


617
SOANI